**<u>निशाणी-५ वर आदेश</u>**

(.......आज रोजी दिनांक २६ जुन, २०१५........)

०१. प्रस्तुतचा अर्ज हा वादी याने वाद मिळकत ही कोणालाही, ति-हाईत इसमांना कोणत्याही स्वरूपाने हस्तांतरीत करू नये, अथवा दाव्यातील मिळकतीवर कुठल्याही स्वरूपाचा बोजा निर्माण करू नये, याकरीता तात्पुरता मनाई हुकूमासाठी सादर केला आहे.

०२. अर्जातील वस्तुस्थिती संक्षिप्तपणे खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

वादीच्या अभिकथनाप्रमाणे तुकडी व जिल्हा नाशिक पोट तुकडी व तालुका नाशिक पैकी मौजे वाडी बु. येथील शेतजमिन गट क्र.२५२ यासी क्षेत्र हे. २. ३१ आर + पो.ख. हे.००-३० आर असे एकुण क्षेत्र हे.२.६१ आर व गट क्र.९७ यासी क्षेत्र हे.००-६९ आर याबददल वाद असल्यामुळे प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. (सोयीकरीता या मिळकतीस यापुढे वाद मिळकत असे संबोधन्यात येत आहे.)

०३. वादीच्या अभिकथनाप्रमाणे, वाद मिळकती या वादींचे वडिलोपार्जित मिळकती आहे. पुर्वी या मिळकती तानाजी पावाजी निरभवणे यांचे नावावर होती व त्यांचे मृत्यूनंतर सदरील मिळकतीस वारसाहक्काने मयत अर्जुन तानाजी निरभवणे यांचे नांव लागले. वादी हे मयत अर्जुन तानाजी निरभवणे यांचे कायदेशिर वारस होते व आहेत. प्रतिवादीचा वाद मिळकतीशी कुठलाही हक्क, हितसंबंध नव्हता व नाही. मयत अर्जुन तानाजी निरभवणे यांचे मृत्युनंतर प्रतिवादी तुकाराम व वादी तसेच वादीची आई भिकुबाई यांची नांवे फेरफार नोंद क्र.४० अन्वये दाखल झाली. तुकाराम अर्जुन निरभवणे हे वादीचे भाउ नव्हते व नाही व या नावाची मौजे वाडी बुाा तालुका कळवण येथे व्यक्तीदेखील नव्हती व नाही. केवळ वादी व वादीची आई मयत भिकुबाई हेच मयत अर्जुन तानाजी निरभवणे यांचे कायदेशिर वारस होते.

०४. वादींच्या अभिकथनाप्रमाणे प्रतिवादीचे नाव तुकाराम आनंदा सोनवणे व त्याचे आईचे नाव राधाबाई असे होते. राधाबाई ही मयत अर्जुन तानाजी निरभवणे यांची पत्नी हाती व ती १० वर्षापुर्वी मयत झालेली आहे. ती मयत अर्जुन यास सोडुन

निघुन गेली व आनंदा सोनवणे रा.लखमापुर, ता.दिंडोरी यांचेबरोबर राहु लागली. अर्जुन निरभवणे मयत झालेनंतर प्रतिवादी व राधाबाई यांनी रेव्हेन्यू अधिकारी यांचेशी संगनमत करून व त्यांचेशी हातमिळवणी करून वाद मिळकत गट नं.२३ सह मयत अर्जुनचे वारस म्हणुन त्यांचे नाव बेकायदेशिरपणे लावुन घेतले. त्यानंतर संबंधित तहसिलदार कळवण यांनी त्यांचेकडील दि.३०.१२.१९८३ चे आदेशाने वादींची वडिलोपार्जित मिळकत गट क्र.२३,९७ व २५२ या मिळकतीचे वाटपाचा हुकूम करून गट क्र.२३ ही मिळकत दत्तु निरभवणे याचे नावाने व वाद मिळकत गट क्र.९७ व २५२ ही प्रतिवादीचे नावाने दर्शविली. सदर वाटपाचा आदेश बेकायदेशिर आहे. वाद मिळकती पुर्वीपासुन वादी हेच वारसा हक्काने व मालकी हक्काने वहिती करीत आलेले होते व आहे. प्रतिवादीचे वाद मिळकतीचे ७/१२ उता-याला जरी नाव लागले असले तरी प्रतिवादीस वाद मिळकतीमध्ये कायद्याने मालकी हक्क प्राप्त होत नव्हता व नाही.

०५.	वादींच्या अभिकथनाप्रमाणे प्रतिवादी हे दोन वर्षापुर्वी नाशिक महानगरपालिकेतुन निवृत्त झाले व दोन अडीच महिन्यापुर्वी काही इसमांना वाद मिळकतीवर घेवुन आले होते. प्रतिवादी हा वाद मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहे. प्रतिवादीने वाद मिळकत ति-हाईत इसमांना हस्तांतरीत केल्यास अथवा वाद मिळकतीवर कुठल्याही स्वरूपाचा बोजा निर्माण केल्यास वादीचे मालकी हक्कास बाधा निर्माण होणार आहे. सबब सदर दाव्याचा अंतिम निकाल लावण्यास बराच अवधी असुन वादींनी सदरचा अर्ज मंजुर करावा, अशी विनंती केली.

०६.	वाद पत्रातील अभिकथन अमान्य करून प्रतिवादी याने वाद पत्रातील सर्व कथने अमान्य करून म्हणणे (नि.१३) अन्वये सादर केले व त्यात वाद पत्रातील सर्व मजकुर अमान्य केला आहे. तसेच, वाद मिळकतीच्याच गावी गट क्र.२३ हा देखील असुन वादीने त्याचे वर्णन जाणीपुर्वक केलेले नाही. वादींचे वाद मिळकतीचे केलेले वर्णन व ७/१२ उतारे यात विसंगती आहे. मयत अर्जुन याला एकुण दोन पत्नी पैकी पहिली कायदेशिर पत्नी राधाबाई असुन तिचेपासुन प्रतिवादी हा कायदेशिर वारस आहे. मयत अर्जुन याने राधाबाई हयात असतांना भिकुबाईला घरात आणुन ठेवले व तिचेपासुन वादी हे अपत्य झाल्याने वादी हे अनौरस अपत्य असुन त्यांना हिंदू मयताचे इस्टेटीत कायदयाने कोणताही हक्कच प्राप्त होत नाही. त्यामुळे वादींना

प्रस्तुतचा दावा करण्याचा अधिकार नाही. मयत अर्जुनच्या पश्चात वारस नोंद नं.१२ झाली व त्याविरूध्द केलेल्या अपिलातील हुकुमानुसार प्रतिवादी, वादी व भिकुबाई असे वारस ठरविण्यात आले व तशी नोंद दि.२३.५.७७ रोजी झाली. सदर नोंदीबाबत वादीने आजपावेतो कधीही तक्रार केली नव्हती व नाही व त्यामुळे सदर नोंद आजही अस्तित्वात आहे. वादी नं.१ व प्रतिवादी यांचे दरम्यान दि.४.११.१९७३ रोजी वादी व त्याची आई भिकुबाई यांनी प्रतिवादीचे लाभात वाद मिळकत गट नं.९७ व गट नं. २५२ प्रतिवादीस वाटपात देवुन तसे संमतीपत्र करून दिले. त्यानंतर दि.२९.६.१९७८ रोजी वादी नं.१ व प्रतिवादी यांचेदरम्यान वाटणीपत्र होवुन गट नं.९७ व गट नं. २५२ प्रतिवादीस व गट नं.२३ वादी नं.१ यास देण्यात आले व त्याप्रमाणे नोंद नं. २४४ आजही तशीच आहे. अशाप्रकारे गट नं.२५२ व गट नं.९७ प्रतिवादीच्या वाटणीस येवुन सन १९८४ पासुन ते आजपावेतो ते प्रतिवादीच्या कब्जात आहे.सदरहु वाटपास वादी क्र.२ हिला सामिल न केल्यामुळे तिने रे.मु.नं.२०/१९९५ वाटपाकरीता केला होता व तो मंजुर होवुन तिला १/१६ हिस्सा देण्याचा हुकूम झाला परंतु तिने प्रतिवादीकडे रोख रकमेची मागणी करून ३,००,०००/- रूपये रक्कम मिळालेनंतर तिने गट क्र.२५२ व ९७ मधील हक्क सोडुन दिला आहे. प्रतिवादीने वाद मिळकतीचे कब्जेवहिवाटीकरीता दाखल केलेला रे.मु.नं.६५/२००४ मंजुर होवुन वादीस प्रतिवादीचे कब्जेवहिवाटीस अडथळा न करण्याची निरंतरची ताकीद देण्यात आलेली आहे. वादीने प्रतिवादीला त्रास देण्याच्या दृष्ट हेतुने प्रस्तुतचा दावा दाखल केल्याने वादीचा दावा खर्चासह नामंजुर करून प्रतिवादीला नुकसान भरपाई मिळण्याची विनंती प्रतिवादीने केली आहे.

०७. अर्ज (नि.०५), म्हणणे (नि.१३) तसेच दोन्ही पक्षातर्फे त्यांच्या विधिज्ञांनी मांडलेला युक्तीवाद लक्षात घेता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ रूल १ लक्षात घेवून खालील मुद्दे निश्चित करुन त्यावरील कारणमिमांसा निष्कर्षासह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **मुद्दे.** | | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| (१) वादीने प्रथमदर्शनी केस सिद्ध केली आहे काय? | .... | होय. |
| (२) न्यायाचा समतोल वादी/अर्जदाराच्या बाजुने आहे काय? | .... | होय. |

(३) तात्पुरत्या मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर केला तर वादी/
अर्जदाराचे अतोनात नुकसान होईल काय? .... होय.

(४) आदेश काय? .....अंतिम आदेशाप्रमाणे

## कारणमिमांसा

०८. अर्जातील वस्तुस्थितीच्या पुष्टयर्थ वादीने निशाणी.३ च्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवर भिस्त ठेवली. याखेरीज वादीने सादर केलेला कागदोपत्री पुरावा खोडुन टाकण्यासाठी प्रतिवादीने एकही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही.

### मुददा क्र.१ ते ३ बाबत :-

०९. उपरोक्त सर्व मुद्दे ऐकमेकांशी निगडीत असल्यामुळे चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात येत आहे. वादी/अर्जदार यांच्या कथनाप्रमाणे त्यांनी प्रतिवादींसोबत असलेले नातेसंबंध नाकारले आहे. परंतु प्रतिवादी हा अर्जुन निरभवणे याचा मुलगा आहे, हे सकृतदर्शनी सिद्ध करण्यासाठी निशाणी १६ च्या दस्तऐवज यादीसोबत शाळा सोडल्याचा दाखला, आईचे मृत्युचे प्रमाणपत्र तसेच रे.मु.नं.६५/२००४ मधील हुकुमनाम्याची प्रत, यास्तव रे.मु.नं.६५/२००४ मधील निकालाची प्रत प्रकरणात दाखल केली आहे. या कागदपत्रांचे लक्षपुर्वक आवलोकन केले असता त्यावरून प्रतिवादी हा अर्जुन निरभवणे याचा मुलगा असुन राधाबाई ही त्याची आई आहे आणि प्रतिवादीच्या नावापुढे अर्जुन निरभवणे असे वडीलांचे नाव आहे, करीता, प्रतिवादी हा अर्जुन निरभवणे यांचा मुलगा आहे, ही बाब प्रतिवादीने सकृतदर्शनी सिद्ध केली असुन प्रतिवादी हा अर्जुन निरभवणे यांच्याशी कोणतेही नातेसंबंध नाही, हे वादी सकृतदर्शनी सिद्ध करण्यास अपयशी ठरला.

१०. वादी/अर्जदारांच्या अभिकथनाप्रमाणे, फेरफार नोंद नं.४० व नोंद नं. २४४ हया कायदेशीर नाही व प्रतिवादीने केवळ त्याच्या नावाचा गैरवापर करून खोटया नोंदी करून घेतल्या. परंतु, सदर बाब सिद्ध करण्यासाठी वादीने सकृतदर्शनी

कोणताच पुरावा सादर केला नाही. यास्तव, सदर नोंदी विरूद्ध वादीने अपिल दाखल करून त्याजागी नविन नोंदी लावून घेतल्या नाहीत. त्यामुळे महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियमचे कलम १५७ अन्वये नोंद. ४० व नोंद.२४४ हया ख-या व बरोबर आहेत, असे गृहित धरून वादींनी मांडलेला उपरोक्त अभिकथन निरर्थक असल्यामुळे फेटाळून लावण्यात येत आहे.

११. वादींनी पुढे असे अभिकथन केले आहे की, सर्व वाद मिळकतींवर वादी क्र.१ याचा ताबा होता/आहे, हे सिद्ध करण्यासाठी वादींनी कोणताच पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. यास्तव दाखल केलेला गट क्र.२३ च्या ७/१२ उता-याच्या वाचनावरून वादी क्र.१ याचा गट क्र.२३ वर ताबा असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध होत असुन ही बाब प्रतिवादीला मान्य आहे. परंतु, वाद मिळकतींवर ताबा असल्याचे प्रतिवादने स्पष्ट नाकारले आहे.

१२. प्रतिवादीने असा ठोस बचाव घेतला की सन १९८४ मध्ये वादी व प्रतिवादीमध्ये सरसनिरस मानाने वाटप झाले व वाद मिळकती म्हणजेच गट क्र.२५२ व गट क्र.९७ हे प्रतिवादीला वाटणीत देवुन गट क्र.२३ ही मिळकत वादीला देण्यात आली. सदर बाब वादीने अमान्य केली आहे. सदर वाद बचाव सिद्ध करण्यासाठी वादीने दाखल केलेले हक्काचे पत्र, फेरफार क्र.२४४ या कागदपत्रांच्या आवलोकनावरून वादी व प्रतिवादीमध्ये वाद मिळकतींचे वाटप झाले व त्यादिवशी मिळकतींचा ताबा दिला, हे सकृतदर्शनी सिद्ध झाले. परंतु आज रोजी वाद मिळकतींवर वादीचा कब्जा आहे हे दाखविण्यासाठी वादीने कोणताच पुरावा अभिलेखावर सादर केला नाही. यास्तव वादीने नि.२२ च्या दस्तऐवज यादीसोबत दाखल कलेला ७/१२ उतारा व फेरफार क्र.१०८९ च्या कागदपत्रांच्या आवलोकनावरून सदरचा दावा प्रलंबित असतांनाही प्रतिवादीने वाद मिळकत गट क्र.९७ ही श्री.योगेश लक्ष्मण पगार याने कायमस्वरूपी खरेदीखताअन्वये विक्री केली असल्याचे सकृतदर्शनी सिद्ध होत असल्यामुळे उर्वरित गट क्र.२५२ या मिळकतीवर अद्यापपर्यंत प्रतिवादीने ति-हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित केला नाही. त्यामुळे प्रतिवादीच्या वागणुकीवरून हे स्पष्ट झाले आहे की प्रतिवादी हा वाद मिळकतीवर ति-हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच ७/१२ उतारा हा गट क्र.९७ चा असुन सन २०१४ -२०१५ या कालावधीत दि.२८.४.२०१५ रोजी वाद मिळकत गट क्र.९७ वर

कळवण बुाा संस्थेचे १,७५,०००/- रूपयांचे कर्ज घेवुन बोजा निर्माण केला हे सकृतदर्शनी सिद्ध झाले असल्यामुळे प्रतिवादी वाद मिळकतीवर ति-हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित करून बोजा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे हे वादीने दाखल केलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून सिद्ध केले आहे.

१३. आता वाद मिळकत गट क्र.२५२ ही केवळ प्रतिवादीच्या नावावर राहिली आहे त्यामुळे प्रतिवादीने जर दावा प्रलंबित असतांना ति-हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित केला तर दाव्यात गुंतागुंत वाढुन या दाव्याचा अंतिम निकाल लागण्यास अडथळा निर्माण होईल तसेच जर भविष्यात वाद मिळकतमध्ये वादीचा मालकी हक्क व ताबा, आहे असा निष्कर्ष निघाला तर तोपर्यंत प्रतिवादीने जर उर्वरित वाद मिळकतींवर ति-हाईत इसमाचा हक्क प्रस्थापित केला तर निश्चितच वादींच्या मालकी हक्कास बाधा निर्माण होईल व त्यांचे कधीही भरून न येणारे अपरिमित नुकसान होईल. तसेच जर तात्पुरता मनाई हुकूमाचा अर्ज मंजुर केला तर प्रतिवादीला कोणतेही नुकसान होण्याची संभावना दिसुन येत नाही. याउलट सदरचा अर्ज मंजुर करण्यापुर्वी प्रतिवादी ज्या पध्दतीने वाद मिळकतीचा उपभोग घेत आहे त्या पध्दतीने या आदेशानंतरही उपभोग घेवु शकतो. त्यामुळे प्रकरणात दाखल असलेल्या कागदोपत्री पुराव्यावरून वादीने सकृतदर्शनी अर्ज सिद्ध केला असुन न्यायाचा समतोल वादीच्या बाजुने आहे. तसेच सदरचा अर्ज नामंजुर केला तर वादींना कधीही न भरून येणारे नुकसान होईल, हे वादींनी सकृतदर्शनी सिद्ध केले आहे. परिणामी मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यात आहे.

**<u>मुददा क्र. ४ बाबत :-</u>**

१४. मुददा क्र. १ ते ३ च्या होकारार्थी उत्तरामुळे अर्ज निशाणी-५ मंजुर होण्यास पात्र ठरतो. तसेच दोन्ही पक्षकारांना सदर दाव्याच्या पुढील कामकाजाच्या खर्चास सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे अर्जाचा खर्च दाव्यासोबत लावण्यात येत आहे. सबब, मुददा क्र.४ च्या निष्कर्षार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी याने किंवा त्याच्या मार्फत कोणत्याही इसमाने वाद मिळकतींवर ति-हाईत इसमाचा हक्क कोणत्याही प्रकारे निर्माण करू नये, असा तात्पुरता मनाई हुकूम दाव्याचा अंतिम निकाल लागे पर्यंत देण्यात येत आहे.

३. अर्जाचा खर्च दाव्यासोबत.

दिनांक.२६.०६.२०१५.

(एस.पी.पैठणकर),
सह दिवाणी न्यायाधीश,(क.स्तर),
ता.कळवण, जि.नाशिक